# बालाकोट स्ट्राइक आणि ३७० हटवण्यासारखे निर्णय पहिलेच माहिती होते- काँग्रेसचा सवाल

पान १ वरुन...

## मुंबई कोर्टाच्या न्यायाधीशास सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

कोणत्याही याचिकेला नंबर द्यायचा की नाही हे फक्त तांत्रिक म्हणजेच मिनिस्टरीअल स्वरुपाचे काम असते. कोणतीही याचिका योग्य आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार फक्त न्यायालयालाच असून संबंधीत याचिकाकर्त्याला न ऐकता रजिस्ट्रारने याचिका दाखल न करुन घेण्याचा एकतर्फी निर्णय देणे चुकीचे आहे. त्यामुळे रजिस्ट्रारने स्वतः न्यायाधीश बनून दिलेले आदेश हे रद्द ठरतात. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश हे एखाद्या व्यक्तीला, अधिकाऱ्याला, न्यायाधीशाला किंवा एखाद्या प्रकरणाशी संबंधीत नसतील तरीसुद्धा तो कायदा सर्वांना बंधनकारक असतो. त्या कायद्याविरुद्ध जावून आदेश पारीत करणारे व कोणतेही काम करणारे लोकसेवक, पोलीस, न्यायाधीश हे कोर्ट अवमानना अंतर्गत शिक्षेस पात्र राहतील. तसेच त्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यास टाळाटाळ करणारे वरिष्ठ पोलीस अधिकारी सुद्धा कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाईस पात्र राहतील, असा कायदा सर्वोच्च न्यायालयाने Re : M. P. Dwivedi AIR 1996 SC 2299 प्रकरणात ठरवून दिला असून त्या प्रकरणात संबंधीत पोलीस कर्मचारी, त्यांचे वरीष्ठ जिल्हा पोलीस अधीक्षक व संबंधीत प्रथम श्रेणी न्यायाधीश या सर्वांना कोर्ट अवमानना अंतर्गत दोषी ठरविले होते. कायद्याच्या बाहेर जावून निर्दोष लोकांना त्रास देणे व आरोपींना मदत करण्यासाठी बेकायदेशीर आदेश पारीत करणाऱ्या न्यायाधीशांविरुद्ध फौजदारी कारवाईच्या शिक्षेसाठी भादंवी १६७, १९२, १९३, २०१, २०२, २०१३, २१८, २१९, २२०, ४६५, ४६६, ४७१, ४७४, १९४, १९५, १०९, ४०९, ५००, ५०१ & २११ इत्यादी कलमाअंतर्गत कारवाई होवू शकते व संबंधीत न्यायाधीशास ७ वर्षापासून जन्मठेपेपर्यंत शिक्षा होवू शकते, अशी कायद्यात तरतूद आहे. [K. Rama Reddy 1998 (3) ALD 305 , Raman Lal 2000 SCC OnLine Raj 226, Kamlakar bhavsar 2002 ALL MR (Cri) 2640, Govind Mehta AIR 1971 SC 1708, Bidhi Singh 1993 Cri.L.J. 499, B. S. Sambhu AIR 1983 SC 64, Sailajanand Pande AIR 1969 Pat 194].

**न्यायाधीशांविरुद्ध कारवाई झालेली फौजदारी व बडतर्फीची प्रकरणे**

1 ) दुसऱ्या प्रकरणात Somabhai Patel (2001) 5 SCC 65 सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ काढून आदेश पारीत करणाऱ्या न्यायाधीशास कोर्ट अवमाननाचा दोषी ठरवून त्यांच्याविरुद्ध बडतर्फी / निलंबनाची व इतर विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

2) Smt. Prabha Sharma (2017) 11 SCC 77 प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आरोपी न्यायाधीशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाचे आदेश न मानल्यामुळे करण्यात आलेली विभागीय चौकशी योग्य ठरवून न्यायाधीशाची याचिका खारीज केली होती.

3) R. R. Parekh (2016) 14 SCC 1 प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दोषी न्यायाधीशाची बडतर्फी योग्य ठरवितांना असा कायदा ठरवून दिला की, बेकायदेशीरपणे पारीत केलेले आदेश हाच न्यायाधीशाच्या भ्रष्टाचाराचा पुरावा असतो. अशा न्यायाधीशांविरुद्ध कारवाईसाठी कोणत्याही अतिरीक्त पुराव्याची आवश्यकता नाही.

४) दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शमीत मुखर्जी यांनी पैसे व इतर फायदे करवून घेत बेकायदेशीर आदेश पारीत केल्यामुळे त्यांना अटक केली होती व १३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. [Shameet Mukharjee 2003 DRJ (70) 327].

५) न्यायाधीशाने पारीत केलेले बेकायदेशीर आदेशास हे वरील न्यायालयात आव्हान देणे गरजेचे नसून शिस्तभंग, बडतर्फी व इतर फौजदारी कारवाई करता येते, असा कायदा आहे. [Union of India Vs. K . K. Dhawan (1993) 2 SCC 56, Srirang Waghmare Vs. State 2019 SCC OnLine SC 1237, Nirmal Yadva 2011 (4) RCR (Criminal) 809].

६) न्यायाधीशाने एका विशीष्ट वकिलास मदत करण्यासाठी पारीत केलेले आदेश हा भ्रष्टाचार असून अशा न्यायाधीशास बडतर्फच केले पाहिजे, असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयाने Srirang Waghmare Vs. State 2019 SCC OnLine SC 1237 प्रकरणात ठरवून दिला आहे.

७) निर्दोष व्यक्तींना चुकीचे वारंट काढून त्रास देणारे न्यायाधीशांविरुद्ध उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल होवून कारवाई झाली आहे. २००५ Guj (Jud. Warrant cases)]

८) निर्दोष व्यक्तींना खोट्या गुन्ह्यात फसविणारे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश रमण लाल व त्यांच्या कटात सामील पोलीस अधीक्षक राजीव भट यांच्याविरुद्ध प्र. श्रे. न्यायाधीशाने १५६(३) नुसार दिलेले आदेश हे योग्य असल्याचे मत उच्च न्यायालयाने नोंदवून आरोपी हायकोर्ट जजची याचिका खारीज केली होती. त्या न्यायाधीशाला पदावनती (demotion) करुन कनिष्ठ न्यायालयात पाठविण्यात आले होते. [Raman Lal Vs. State 2000 SCC OnLine Raj 226].

९) अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शुक्ला यांनी भ्रष्टाचार करुन कायद्याविरुद्ध जावून बेकायदेशीर आदेश पारीत केल्याचे सिद्ध झाल्यामुळे त्यांची सर्व कामे काढून घेण्याचे आदेश सरन्यायाधीश यांनी दिले होते व सीबीआयने त्यांना आरोपी बनवून त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. (दै..........मध्ये दि........ रोजी प्रकाशीत बातमी)

१०) न्यायाधीशाने स्वतःला राजा समजून काहीही बेताल आदेश व मला आवडतो तोच कायदा या वृत्तीने वागू नये, असे कठोर शब्दात ताशेरे ओढत सर्वोच्च न्यायालयाने न्या. शुक्ला यांचे बेकायदेशीर आदेश रद्द ठरविले होते. [Medical Council (2018) 12 SCC 564]

११) Jagat Patel MANU/GUJ/0361/2017 प्रकरणात भ्रष्टाचारी न्यायाधीशांचे स्टिंग ऑपरेशन करण्यात येवून आरोपी न्यायाधीशांना अटक झाली होती व न्यायाधीशांचे फोन डिटेल व इतर तपास करण्याकरीता प्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आला होता.

१२) सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांनी म्हटले की, ५०% न्यायाधीश भ्रष्ट आहेत. (१४ एप्रिल २०१५)

१३) एका वकीलास अपशब्द वापरण्याबाबत आरोपी न्यायाधीशाच्या विरोधात मानहानी बदनामीचा खटला (भारतीय दंड विधान कलम ५००) दाखल झाला होता आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यास योग्य ठरवून म्हटले की, ' कोणत्याही व्यक्तीचा अपमान करणे हे न्यायाधीशाचे काम नाही आणि अशा न्यायाधीशांविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी शासनाची पूर्व संमती घेण्याची आवश्यकता नाही' थेट न्यायालयात त्यांच्या विरोधात खटला दाखल होऊ शकतो आणि अशा न्यायाधीशाला आरोपी बनवू शकतो (AIR 1983 SC 64) १४) दाव्याच्या रोजनामामध्ये छेडछाड / हस्तक्षेप करणाऱ्या न्यायाधीशाच्या विरोधात मुख्य जिल्हा न्यायाधीश यांनी भारतीय दंड विधान अंतर्गत कलम १६७, ४७१, ४७४, ४६६ इ. अन्वये फौजदारी खटला दाखल केला होता. ज्यास सर्वोच्च न्यायालयाने देखील योग्य मानले होते. (AIR 1971 SC 1708)

१५) न्यायालयात एखाद्या व्यक्तीबद्दल अपशब्द वापरणाऱ्या न्यायाधीशाच्या विरोधात भादंविच्या कलम ५०४ नुसार कुठल्याही पूर्व संमती शिवाय दावा चालवता येऊ शकतो. (1993 Cri. L.J. 499 )

१६) आदेश देतांना भ्रष्टाचार करणारे गुजरात (वापी ) येथील दोन न्यायाधीशांना अटक करण्यात आली. वकिलाने आरोपी न्यायाधीशांच्या चेंबरमध्ये गोपणीय व्हिडीओ कॅमेरा लावून ४० दिवसात १ कोटीची लाच प्र. श्रे. न्यायाधीश घेत असल्याचे उघड केले. **(27/09/2015)**

१७) आरोपीला बेड्या लावणाऱ्या पोलीसा विरोधात कारवाई न करणाऱ्या महाराष्ट्र न्यायपालिकाचे न्यायाधीश एस. बी. निकम यांना सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल दोषी ठरवले. (परंतु शिक्षा ठोठावली नाही ) (AIR 1906 SC 2299 )

१८) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे अवमान करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास सर्वोच्च न्यायालयाने दोषी ठरवले. (2010) 6 SCC (417)

१९) एका व्यक्तीला जामीन न देता बेकायदेशीर पद्धतीने त्यास अटकेत ठेवणाऱ्या न्यायाधीशास दोषी ठरवून उच्च न्यायालयाने सांगितले की, अशा न्यायाधीशांना कोणतेही संरक्षण दिले जाऊ शकत नाही. (AIR 1969 Pat 194)

२०) जनार्दन मोहन रेड्डी प्रकरणात सीबीआयच्या न्यायाधीशाला १० करोड रुपये लाच घेण्याच्या आरोपात सीबीआयने अटक केली. याला अनुसरुन सर्वोच्च न्यायालयाने टिपण्णी केली की, 'न्यायपालिकेला भ्रष्टाचारापासून दूर ठेवा' (TNN 20 Feb 2015 )

२१) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही एका व्यक्तीस चुकीचा फायदा मिळवून देण्यासाठी बेकायदेशीर आदेश देणाऱ्या न्यायाधीशावर टिपण्णी करताना न्यायाधीश मार्कडेय काटजू व श्रीमती. ज्ञानसुधा मिश्रा बेंचने म्हटले की' भ्रष्ट न्यायाधीशांना बाहेर फेकून द्यायला पाहिजे. (Mail Today 11 May 2011)

२२) सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या भ्रष्ट आणि अनैतिक आचरणाबाबत आपल्या लिखित आदेशात अशी टिपण्णी केली की, 'जे लिहिले आहे ते योग्य आहे' व अलाहाबाद उच्च न्यायालयाने दाखल केलेल्या याचिकेस फेटाळून लावले. (I. The Hindi, Chennai 10 Dec 2010, 30 March 2013) (ii. Hindustan Times 12 Dec 2010 )

२३) अलाहाबाद सर्वोच्च न्यायालयाच्या ५ भ्रष्ट न्यायाधीशांची चौकशी केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश एच. कपाडिया यांना असे आढळले की, 'ते भ्रष्ट आहेत' परंतु त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली गेली नाही. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मार्कडेय काटजू यांनी ब्लॉग टिपण्णी केली. (टाईम्स ऑफ इंडिया) (मुख्य न्यायाधीश कपाडिया हे भादंवि अंतर्गत कलम २१८, २०१ अन्वये शिक्षेस पात्र ठरतात अशी तक्रार देण्यात आली होती.

२४) सर्वोच्च न्यायालयाचे वकील प्रशांत भूषण आणि पूर्व कायदा मंत्री शांती भूषण यांनी शपथ पत्रासोबत पुरावे दाखल केले की, 'सर्वोच्च न्यायालयाचे आठ मुख्य न्यायाधीश भ्रष्ट होते'. 'परंतु त्या भ्रष्ट न्यायाधीशांवर कोणतीही कारवाई केली गेली तर नाहीच मात्र वकील भूषण यांना नोटीस देऊन त्यांच्यावर दबाब निर्माण केला काय हेच लोकतंत्र आहे? (TNN 17 Sep)

२५) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मार्कडेय काटजू यांनी सांगितले की, 'मद्रास उच्च न्यायालयाचे एका भ्रष्ट न्यायाधीशास सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश बनवण्यासाठी शासनाने दबाव टाकला होता आणि त्याच भ्रष्ट न्यायाधीशास सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीश बनवले गेले होते. (20 July 2014, 21 July 2014 TOI)

२६) कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पी. डी. दिनाकरन यांच्या विरोधात भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झाल्यावर देखील त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. केवळ त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

२७) कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जस्टीस सौमित्र सेन यांनी २२.८३ लाखांची अफ़रातफरी केली राज्यसभेद्वारे निलंबित केले गेले. (त्यांच्यावर भादंवि अंतर्गत कलम ४०९ नुसार कोणतीही कारवाई होणे अपेक्षीत आहे. (17 August 2011)

२८) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसाद यांच्याद्वारे १ हजार कोटीच्या भ्रष्टाचार प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे ३ न्यायाधीशांच्या खंडपिठाने वकील शांती भूषण यांची याचिका विशेष लक्ष न देता घाईघाईने फेटाळली. याबद्दल सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष वकील दुष्यंत दवे यांनी देखील पत्र लिहिले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांनी देखील याबद्दल आपल्या ब्लॉगवर लिहिले. (14 April 2015)

२९) ६.८ कोटीच्या पीएफ घोटाळ्यात उच्च न्यायालयाच्या सहा न्यायाधीशांविरुद्ध सीबीआयने दोषारोप पत्र दाखल केले. (Mail Today 4 July 2010) त्या सहा न्यायाधीशांविरुद्ध सीबीआय न्यायालयाने आरोप निश्चित केले.

३०) १० लाख रुपये लाच घेतल्याप्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश निर्मल यादव यांच्या विरोधात सीबीआयने दोषारोप पत्र दाखल केले आणि न्यायालयाने आरोप निश्चित केले. (The Hindu 18 January 2014)

---

**वृत्तसंस्था/ १७ जानेवारी**

**मुंबई:** बालाकोट एअर स्ट्राइकविषयी रिपब्लिक टीव्हीचे एडिटर इन चीफ अर्णब गोस्वामी यांना पहिल्यापासूनच माहिती होते. हा दावा ऑल्ट न्यूजचे को-फाउंडर प्रतीक सिन्हा यांनी केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर एक व्हॉट्सअप चॅटचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. सुप्रीम कोर्टाचे वकील प्रशांत भूषण यांनीही आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, ज्या पुलवामा हल्ल्यामध्ये ४० जवान शहीद झाले, अर्णबने त्याचा आनंद साजरा केला होता. अर्णबला बालाकोट स्ट्राइकची माहितीही ३ दिवसांपूर्वीच मिळाली होती. अर्णबला काश्मीरमध्ये आर्टिकल ३७० हटवण्याविषयीही आधीच माहिती होती.

सोशल मीडिया पोस्ट्समध्ये दावा केला जात आहे की, अर्णब आणि दासगुप्ता यांच्यात ही बातचित २०१९ मध्ये झाली होती. मुंबई पोलिसच्या क्राइम ब्रांचजवळ उपलब्ध ५०० पेजच्या व्हॉट्सअप चॅटचा हा भाग असल्याचे सांगितले जात आहे. टीआरपी घोटाळ्याचा तपास करत असलेल्या मुंबई क्राइम ब्रांचने नुकतेच ३,६०० पानांची सप्लीमेंट्री चार्टशीट मुंबई हायकोर्टात दाखल केली आहे. यामध्ये पेज नंबर १९९४ ते २५०४ पर्यंत अर्णब आणि दासगुप्ता यांच्या झालेल्या व्हॉट्सअप चॅट आहेत.



मीडियामध्ये व्हायरल झालेली व्हॉट्सअप चॅट बनावट TRP केसमध्ये फाइल करण्यात आलेल्या सप्लीमेंट्री चार्जशीटचा भाग आहे : मुंबई, पोलिस

**काँग्रेसचे सवाल**

माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेस नेता मनीष तिवारी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले, 'जर मीडियाच्या एका भागाची रिपोर्टिंग योग्य आहे तर प्रश्न असा आहे की, बालाकोट स्ट्राइक आणि २०१९ च्या निवडणुकांमध्ये काही संबंध आहे? निवडणुकीत फायद्यासाठी राष्ट्रीय सुरक्षेला मुद्दा बनवण्यात आले? याचा संयुक्त संसदीय समिती कडून तपास व्हायला हवा.'

**पोलिसांनी म्हटले - व्हायरल चॅट चार्जशीटचा भाग**

मीडियामध्ये ही चॅट लीक झाल्यानंतर सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन वजे यांनी म्हटले की, ही चॅट हायकोर्टमध्ये दाखल केलेल्या सप्लीमेंट्री चार्जशीटचा भाग आहे. मात्र, ही मीडियापर्यंत कशी पोहोचली. याची माहिती त्यांना नाही. अर्णब आणि BARC चे माजी CEO यांच्यातील जी चॅट प्रतीक सिन्हाने शेअर केली आहे, त्यामध्ये अर्णबने लिहिले आहे की, स्ट्राइक करुन निवडणूक जिंकली जाईल.

प्रशांत भूषण यांचा दावा - 'निवडणुकीसाठी नॅशनल सिक्युरिटीचा विचार करण्यात आला नाही'

यापूर्वी शुक्रवारीही प्रशांत भूषण यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहिली होती. यामध्ये त्यांनी एक व्हॉट्सअप चॅटचे स्क्रीनशॉट्र्स शेअर केले होते. यामध्ये एक नाव अर्णब गोस्वामींचे दिसत आहे. तर दुसरे नाव पार्थो दासगुप्ता असल्याचा दावा केला जात आहे. दासगुप्ता ब्रॉडकास्ट ऑडियंस रिसर्च काउंसिल म्हणजेच BARC चे २०१३ ते २०१९ या काळात CEO होते. फेक TRP केसमध्ये त्यांना अटक झाली आहे. BARC ती संस्था आहे, जी देशाच्या ४५ हजार घरांमध्ये टीव्हीवर लावल्या बार-ओ-मीटरच्या माध्यमातून प्रत्येक आठवड्यात कोणते चॅनल किती पाहिले गेले हे सांगते.

व्हायरल होत असलेल्या स्क्रीनशॉटमध्ये काय लिहिले आहे हे आम्ही सांगत आहोत...

प्रतीक सिन्हा यांनी जे स्क्रीनशॉट शेअर केले आहे, त्यामध्ये अर्णब गोस्वामी म्हणत आहे की, काही तरी मोठे होणार आहे. हे स्क्रीनशॉट्र्स २३ फेब्रुवारी २०१९ चे आहेत.

---

## सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतरही आंदोलन का? शेतकऱ्यांनी हट्ट सोडत चर्चा करावी : कृषी मंत्री तोमर

करण्याच्या मागणीवर आपण ठाम असल्याचे स्पष्ठ केले.दोन मुद्दे आहेत, शेतीविषयक ३ कायदे मागे घ्यावे आणि एमएसपीवर बोलावे, असं ते म्हणाले. तसेच आजच्या बैठकीत काहीही तोडगा निघालेला नाही. आता पुन्हा १९ जानेवारीला बैठक होणार आहे. शेतकरी केवळ केंद्र सरकारशी बोलतील. सुप्रीम कोर्टाने स्थापन केलेल्या समितीकडे आम्ही चर्चेसाठी जाणार नाही. चर्चेसाठी आमचं प्राधान्य एमएसपी असेल. सरकार एमएसपीपासून पळत आहे, असं राकेश टिकैत यांनी म्हटलं.

दिल्ली पोलीस कमिश्नर एसएन श्रीवास्तव यांनी सांगितलं की, २६ जानेवारीला अद्याप वेळ आहे. परंतु, त्या दिवशी तसंही विशेष सुरक्षा व्यवस्था असते. म्हणजेच, २६ जानेवारी रोजी दिल्लीमध्ये शेतकरी ट्रॅक्टर रॅलीबाबत अद्याप शेतकरी संघनांनी संपूर्ण योजना सांगितलेली नाही, तसेच पोलिसांकडूनही कोणती माहिती दिली जात नाही. अशातच प्रजासत्ताक दिनी दिल्लीमध्ये ट्रॅक्टर परेड संदर्भात सुप्रीम कोर्टा सुनावणी पार पडणार आहे.

कायद्याच्या अंमलबजावणीवर सुप्रीम कोर्टाची स्थगिती

१२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने तीन नवीन कृषी कायद्याच्या अंमलबजावणीवर स्थगिती दिली होती. तसेच कोर्टाने चार सदस्यांची समिती गठीत केली. यामध्ये भारतीय किसान युनियनचे अध्यक्ष भूपेंदर सिंह मान, शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष अनिल घनवट, आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेचे प्रमोदकुमार जोशी आणि कृषी अर्थशास्त्रज्ञ अशोक गुलाटी यांचा समावेश आहे. भूपिंदरसिंग मान यांनी गुरुवारी समितीमधून स्वत: माघार घेतली आहे.

## 'शिवसेनेला मतांची चिंता, त्यामुळेच नामांतराचा 'सामना' सुरु', बाळासाहेब थोरातांची 'रोखठोक' टीका

विकासावर बोलायला हवे थोरात यांनी म्हटलं आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून औरंगाबादमध्ये सत्तेत असलेल्या या दोघांनीही खरंतर औरंगाबादच्या विकासावर बोलायला हवे. औरंगाबादकरांची तीच अपेक्षा आहे. मात्र महानगरपालिकेत सत्तेत असलेल्या या दोघांनीही जनतेचा भ्रमनिरास केला आहे, म्हणूनच निवडणुकीच्या तोंडावर त्यांना नामांतराच्या मुद्द्याचा आधार घ्यावा लागतो आहे. हे दोन्ही पक्ष नामांतराचा मुद्दा काढून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे फार काळ चालणार नाही, औरंगाबादच्या जनतेलाच आज नामांतरापेक्षा विकास महत्वाचा आहे, थोरात यांनी म्हटलं आहे.

औरंगाबादच्या नामांतरावर मुख्यमंत्र्यांचं मोठं वक्तव्य, म्हणाले, 'धर्मनिरपेक्षतेच्या व्याख्येत औरंगजेब बसत नाही'

आमच्या आदर्शाचा मतांची पोळी भाजण्यासाठी वापर करु नका

राज्यात आमचा सहकारी पक्ष असलेल्या शिवसेनेला आपल्या मतांची चिंता वाटते, त्यामुळेच त्यांनी हा नामांतराचा 'सामना' सुरू केला आहे. भाजपच्या बाबतीत बोलायचे झाल्यास ढोंगीपणा हे त्यांचे स्वभाव वैशिष्ठ्यच आहे, त्यामुळे त्यांच्या वागण्या-बोलण्याकडे जनता करमणूक म्हणून बघते आहे, थोरात यांनी म्हटलं आहे की. ते म्हणाले की, राहिला प्रश्न छत्रपती संभाजी महाराजांवरील श्रद्धेचा! छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव वापरून राजकारण करणाऱ्यांनी आम्हाला छत्रपती संभाजी महाराज समजावून सांगण्याची आवश्यकता नाही. आम्ही मराठी आहोत आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे आमचे आराध्यदैवत आहे. त्यामुळेच आम्ही आमच्या आदर्शाचा मतांची पोळी भाजण्यासाठी वापर करणार नाही आणि कोणी तो करत असेल तर त्याला कडाडून विरोध करू, असं ते म्हणाले.

**आमचे सरकार स्थिर आहे, खंबीर**

थोरात यांनी म्हटलं आहे की, महाराष्ट्राचे सरकार यामुळे अस्थिर होईल अशा भ्रमात कोणी राहू नये. आम्ही तिन्ही पक्षांनी अत्यंत विचारपूर्वक महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी सरकार बनविले आहे. हे सरकार बनविताना आम्ही सर्वांनी एकमताने किमान समान कार्यक्रम ठरविला आहे.

हा कार्यक्रम म्हणजे महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, गरीब माणसाच्या हिताचा विचार आहे. भावनेच्या राजकारणाला त्यात थारा नाही. आमचे सरकार स्थिर आहे, खंबीर आहे. त्यामुळे कोणालाही उकळ्या फुटण्याचे कारण नाही, थोरात यांनी म्हटलं आहे.

पान ८ वरुन...

## वाहनासह सव्वाबारा लाखांचा देशीविदेशी दारुसाठा जप्त

आला. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर दारुबंदी कायद्यानुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.ही कारवाई पोलिस अधिक्षक प्रशांत होळकर यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक निलेश ब्राम्हणे यांच्या निर्देशाप्रमाणे पोलिस उपनिरीक्षक गोपाल ढोले, निरंजन वरभे, गजानन लामसे, हमीद शेख, रणजित काकडे, राजेंद्र जयसिंगपूरे, मनिष कांबळे, नवनाथ मुंढे, गोपाल बावणकर, अमोल ढोबाळे आदी कर्मचाऱ्यांनी केली.

## रेती घाटाचा लिलाव एक वर्षासाठी न करता तिन वर्षाच्या कालावधीकरीता निश्चित करावा :खासदार रामदास तडस

जिल्ह्यातील रेती घाट लिलाव न झाल्यामुळे रेती महाग झाली आहे, जिल्ह्यात अनेक पंतप्रधान आवास योजना/रमाई घरकुल योजनेतुन लाभार्थ्यांचे घराचे बांधकाम सुरु आहे, या कामासाठी रेती मिळत नाही, चोरीची रेती बेभाव विकल्या जात असल्यामुळे सर्वसामान्याला बांधकाम करीत असतांना अडचणी निर्माण होते, यासाठी प्रशासनाने त्वरीत घाट लिलाव करावे व हे घाट तिन वर्षाच्या कालावधीसाठी निश्चीत करणे आवश्यक आहे, आयुक्तासोबत सकात्मक चर्चा झाली असुन निश्चीतच सर्व सामान्य जनतेला दिलासा मिळेल असा विश्वास यावेळी खासदार रामदास तडस यांनी व्यक्त केला.

## रस्ते अपघातातील जखमींना मदत करणाऱ्यांना पोलिसांचे सहकार्य : खासदार डॉ. विकास महात्मे

फेडरेशनचे अध्यक्ष विलास भालेराव, अशासकीय सदस्य चंद्रशेखर मोहिते, जनआक्रोश स्वयंसेवी संस्थेचे सचिव रवि कासखेडीकर, अशोक करंदीकर आदी यावेळी उपस्थित होते.

केंद्र शासनामार्फत १८ जानेवारी ते १७ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येणार आहे. यासाठी संसद सदस्य रस्ता सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष परिवहन महामार्ग तथा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आहेत. समितीचे ब्रीद वाक्य 'सडक सुरक्षा-जीवनरक्षा' असे आहे. अभियानादरम्यान अपघात व त्यामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्ती व जखमी व्यक्तीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टिने सर्व संबंधित विभाग विविध उपक्रम राबवित आहेत.

उपक्रमांबाबत माहिती देताना महात्मे म्हणाले की, रस्ते अपघात कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत संपूर्ण जिल्ह्यामध्ये गावोगावी चित्ररथ फिरेल. जनआक्रोश स्वयंसेवी संस्थेमार्फत चौक सभा आयोजित करून बेशिस्त वाहनधारकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगितले जातील. अभियान काळात महिलांची मोटरसायकल रॅली काढण्यात येईल. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन लाजविण्यात येईल. कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात ट्रक तसेच जड वाहनधारकांना वाहतुकीच्या नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. लॉयन्स क्लबमार्फत वाहन चालकांची शारीरिक तपासणी करण्यात येईल. ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी शहरात एक दिवस नो हॉकिंग-डे राबविण्यात येईल. अपघात झाल्यानंतर पहिला एक तास रुग्णावर उपचार करण्यासाठी गोल्डन अवर असतो. या काळात रुग्णाला तात्काळ प्रथमोपचार मिळणे गरजेचे असते. यासाठी रस्त्याच्याकडेला असणारे छोटे दुकानदार, हात ठेलेचालक यांना अपघातानंतर करावयाच्या उपाययोजनांबाबत प्रशिक्षण दिले जाईल. वाहनांवर 'मी वाहतुकीच्या नियमांचे पालन करतो, तुम्हीही करा' असे स्टिकर्स लावण्यात येतील. या अभियानाचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार होऊन ही जनचळवळ व्हावी. अपघातात एखादी व्यक्ती दगावल्यास त्यांच्या कुटुंबियांना विमा संरक्षणाचा लवकर फायदा मिळत नाही. अशा घटनेसाठी विमा कंपन्यांतर्फे लोक अदालत राबविल्या जाईल. जेणेकरुन अपघाती मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना विमा कवचाचा लगेच लाभ मिळेल. सडक सुरक्षा अभियान ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

या अभियानाबाबत नागरिकांमध्ये प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शहरात मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात अपघाताचे प्रमाण २७ टक्के, मृत्यूचे प्रमाण ३२ टक्क्यांनी घटल्याचे दिसून येते. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांचा स्वयंस्फूर्तीने सहभाग महत्वपूर्ण आहे. असेही ते यावेळी म्हणाले.

जिल्ह्यातील ब्लॅक स्पॉट, अपघातांची कारणे व उपाययोजना, वेग मर्यादा, वाहतूक रस्ता सुरक्षा मोहीम, प्रशिक्षण केंद्र आदींवर यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच अभियानादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांबाबत संबंधिताना यावेळी निर्देश देण्यात आले.

## पुलगांव येथे सैन्य दिनानिमित्त वीर नारीचा सन्मान

आले होते. याप्रसंगी वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील वीर नारींचा स्टेशन मुख्यालयाचे ब्रिगेडियर विनय नायर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी सन्मानार्थ ३० हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमात पेंशनसह अन्य मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.कार्यक्रमाला स्टेशन मुख्यालयातील सेवा कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांकडून कृषी पर्यवेक्षक प्रशांत भोयर यांचा सपत्नीक नागरी सत्कार

हमी सहभाग नोंदवीत होते. मात्र हे सर्व कार्य करताना त्यांना आक्रमक मुत्सद्दी शैलीमुळे अधिकाऱ्यांचा आणि विरोधकांचा रोष शेवटपर्यंत सहन करावा लागला.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक व संचालन श्रीकांत तोटे यांनी केले. आभार कृषी सहाय्यक अंकुश लोहकरे यांनी मानले. याप्रसंगी प्रवीण तडस, दिलीप वैद्य, जितेंद्र वाघमारे, दिवाकर खेलकर, दिवाकर पेटकर, अंबादास धोपटे, चिंतामण भुजाडे, समीर वाघमारे, सुरेश तिघरे, योगेश वैद्य, मनोहर जोगे, गणेश तिमांडे, योगेश डगवार, वैभव साखरकर, गिरीधर इंगळे, देविदास भट, प्रकाश चोंदे, सुनिल साखरकर यांच्यासह शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.